**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-३२.

ई-मेलद्वारे

क्रमांक:- संकीर्ण-२०२५/प्र.क्र.ई-१४५०९८९/आरक्षण-३ दिनांक : ४ डिसेंबर, २०२५.

**प्रति,**

**सर्व सहायक आयुक्त (मावक),**

(कोकण विभाग, पुणे, नाशिक, अमरावती, छ. संभाजीनगर व नागपूर)

**विषय:-** बिंदूनामावली तपासणी व आरक्षण निश्चितीबाबत.

सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ५/११/२००९ रोजीच्या शासन परिपत्रकातील तरतूदींनुसार मागासवर्ग कक्षाकडे बिंदूनामावली तपासणी व आरक्षण निश्चितीसाठी प्रस्ताव प्राप्त होत असतात.

२. बिंदूनामावली तपासण्यासाठी विलंब होऊ नये व पदभरती जलद गतीने व्हावी यासाठी नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी प्रस्तावासह परिपूर्ण बिंदूनामावली सादर करण्याबाबत त्यांना सूचित करावे.

३. बिंदूनामावली तपासतांना नियुक्ती प्राधिकारी यांनी दिलेली माहिती व कागदपत्रांची मागासवर्ग कक्षाकडून तपासणी करणे अपेक्षित आहे.

४. पदभरती करण्यास विलंब होऊ नये यासाठी बिंदूनामावल्यांची तपासणी विहित कालमर्यादेत करणे आवश्यक आहे. त्यासाठी बिंदूनामावल्या तपासणीकरिता दिल्यापासून १५ दिवसांत त्यांची तपासणी करण्यात यावी. बिंदूनामावली तपासण्यासाठी अधिक विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

५. बिंदूनामावल्या तपासतांना यापूर्वी झालेल्या तपासणीनंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कागदपत्रांची तपासणी करणे क्रमप्राप्त आहे. पूर्वीच्या कर्मचाऱ्यांची माहिती त्या-त्या वेळी बिंदूनामावली तपासतांना केलेली असल्यामुळे त्याची पुनरावृत्ती शक्यतो टाळावी. जेणेकरून बिंदूनामाल्यांच्या तपासण्या वेळेत पूर्ण करता येतील.

**(सुदाम आंधळे)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत: निवडनस्ती (आरक्षण-३)